# ठाणे महानगरपालिका, ठाणे

स्थावर मालमत्ता विभाग

जाहिर सुचना

श्रीमती अनुपमा आर. सावंत, मागील 15 वर्षे ठाणे रेल्वेस्टेशन जवळील, अशोक सिनेमाच्या पुढे, नेताजी सुभाष पथ या रस्त्यावर भाजी व इतर जिवनावश्यक वस्तु विक्रीचा व्यवसाय करीत होत्या. ठाणे शहरात रस्ता रुंदीकरणाची एक अत्यंत प्रभावी मोहिम राबविली त्यावेळी रस्ता रुंदीकरणात जे छोटे व्यापारी व व्यावसायिकांची ज्या ठिकाणी दुकाने/गाळे होते, रस्ता रुंदीकरणात बाधा येत असल्याने काढुन टाकली आले. श्रीमती अनुपमा आर. सावंत यांचा ठाणे रेल्वेस्टेशन जवळील, अशोक सिनेमाच्या पुढे, नेताजी सुभाष पथ येथील गाळा बाधीत झाल्यामुळे, सदर गाळयाच्या मोबदल्यात ठाणे महानगरपालिकेमार्फत पुनर्वसन पॉलिसीनुसार त्यांना लोढा पॅरेडाईज येथे ज्युपिटर (बी) गाळा नं. 7 ( जे.एस.बी.2) क्षेत्रफळ 99.44 चौ. फुटाचा. इतक्या मोजमाचा गाळा ठा.म.पा/स्था.मा.वि./ कार्या अधि-3381 दिनांक 06/03/2017 अन्वये ताब्यात देण्यात आला होता.

श्रीमती अनुपमा आर. सावंत, यांना ज्युपिटर (बी) गाळा नं. 7 ( जे.एस.बी.2) लोढा पॅराडाईज येथे दिलेला गाळा दिल्यापासून बंद स्थितीत आढळून आला आहे. अर्जदारांनी रस्तारुंदीकरणात बाधीतांमध्ये बायोमेट्रीक केलेले नाही. तसेच गाळयाबाबतचा करारनामा नोंदणीकृत केलेला नाही. श्रीमती अनुपमा आर. सावंत यांच्याकडून करारनामाच्या अटीं व शर्तीनुसार अट क्र. 4,9,18,व 20 अन्वये गाळा काढून घेण्यासाठी मा.आयुक्त सो. यांनी दिनांक14/02/2018 रोजी मान्यता देण्यात आली आहे.

सदरचा गाळा ताब्यात घेण्यात येत असून, सूचना प्रसिध्द झाल्यानंतर सदर गाळयाचा वापर करताना आढळल्यास गुन्हा दाखल करण्यात येईल. यांची नोंद घ्यावी.

सही/-<br>
उप आयुक्त,<br>
स्थावर मालमत्ता विभाग,<br>
ठाणे महानगरपालिका, ठाणे.